ISSN–2278-5655

AMIERJ

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–IX, Issues– VI Nov-Dec 2020

# सामाजिक आंतरक्रिया कुल अध्यापन प्रतिमान - भूमिकापालन


डॉ.संजय बबन देवकर


*सौ.निर्मलाताई थोपटे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, भोर ता.भोर, जि.पुणे*

**अध्यापन :** बर्टन - "अध्यापन म्हणजे अध्ययनाला चालना देणे, मार्गदर्शन करणे, दिशा देणे आणि प्रोत्साहन देणे."

"The Teacher should be like a human glad fly who pricks and stings to the new ideas, thoughts of the pupil."

*Aarhat Publication & Aarhat Journals* is licensed Based on a work at *http: //www.aarhat.com/amierj/*



ISSN–2278-5655

AMIERJ

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–IX, Issues– VI Nov-Dec 2020

अध्ययन कर्ता, वय, मानसिक वय, आशय स्वरूप, उद्दिष्टे, क्षेत्र याला अनुसरून अध्यापन प्रक्रियेत वेगळेपण आवश्यकच यातुनच अध्यापन प्रतिमाने विकसित झाली.

**अध्यापनाची प्रतिमाने (Models of Teaching):**

'Model' या शब्दाचा अर्थ आदर्श, प्रतिकृती, आराखडा किंवा पद्धती या अर्थाने ही संज्ञा वापरली जाते. परंतु येथे मात्र आराखडा पद्धती अथवा आकृतीबंध हा अर्थप्रेरीत आहे.

बांधकाम करताना एखादा आकृतीबंध किंवा आराखडा जसा मार्गदर्शक ठरतो, त्याचप्रमाणे अध्ययनाच्या शेवटी अपेक्षित परिणाम घडवुन आणण्यासाठी क्रमबद्ध पायऱ्यांच्या स्वरूपातील आराखडा अध्यापन प्रतिमानात दिलेला असतो.

अध्यापनात विविध पद्धतींमध्ये शिक्षक - विद्यार्थी आंतरक्रिया, अपेक्षित वर्तन बदल, शास्त्रीय किंवा तात्त्विक बैठक स्पष्ट दिलेली नसते यामुळे विद्यार्थ्यांमध्ये कोणते बदल साधायचे स्पष्ट होत नाही. अध्यापन प्रतिमान मात्र या त्रुटी दूर करते.

शैक्षणिक मानसशास्त्र + सामाजिक मानसशास्त्र + अभ्यासक्रम निर्मिती प्रकल्प +

उत्पादन क्षेत्रातील सल्लागार + प्रशिक्षणक्षेत्र + मानसोपचार = यातील संशोधन व त्यातून ज्ञानाचा विशिष्ट आकृतीबंध म्हणजेच अध्यापन प्रतिमान होय

अध्यापनाच्या प्रतिमानाचे प्रवर्तक हे अमेरिकेतील ब्रुस जॉईस व मार्शावील हे दोन शिक्षणतज्ज्ञ आहेत.

**अध्यापन प्रतिमाने :**

१) शिक्षक कृतींना मार्गदर्शन करणारा आणि अनुदेशन साहित्याची रचना करण्यास उपयुक्त ठरणारा आराखडा असतो.

२) वर्गाध्यापनाबरोबरच विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शनासाठी पुस्तके, चित्रपट, संगणक कार्यक्रम इत्यादी अनुदेशन साहित्याची योग्य योजना करण्यासाठी मार्गदर्शक.

३) शिक्षक - विद्यार्थी आंतरक्रिया स्वरूप, क्रम निश्चिती.

ISSN–2278-5655

AMIERJ

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–IX, Issues– VI Nov-Dec 2020

४) वर्ग अध्ययन - अध्यापन वातावरण निर्मिती करते.

५) विशिष्ट अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यासाठी अध्यापन कार्यनीती.

६) आशयानुरूप अध्यापन प्रतिमान निवड सुलभ.

**व्याख्या :**

"वर्गाध्यापनात अथवा अन्य परिस्थितीतील अध्यापनातील शिक्षक - विद्यार्थी आंतरक्रियेसंबंधी शास्त्रीय तत्त्वांवर आधारित असा तयार केलेला आकृतीबंध किंवा आराखडा म्हणजेच अध्यापन प्रतिमान."

"सुस्थिर तत्त्वांधारे विद्यार्थी आणि शिक्षक यांनी परस्पर सहकार्याने करावयाच्या वातावरण निर्मितीची योजना म्हणजेच अध्यापन प्रतिमान होय."

अध्यापनाच्या प्रतिमानाचे सर्वप्रथम सत्र दिल्ली एन.सी.ई.आर.टी. येथे १९८३ मध्ये घडवून आणले गेले.

**The Families of Models**

**प्रतिमानाची कुले**

| ज्ञानप्रक्रियाकरण कुल | व्यक्तिगत कुल | सामाजिक आंतरक्रिया कुल | वर्तनपरिवर्तन कुल |
|---|---|---|---|
| १) उद्गमन विचार - डिल्डा टाबा | १) अनिर्देशित अध्यापन - कार्ल रॉजर्स | १) समूहअन्वेषण - जॉन डयुई, हर्बर्ट येलेन | १) सशर्त व्यवस्थापन - बी.एफ.स्किनर |
| २) पृच्छा प्रशिक्षण - रिचर्ड सचमन | २) जाणीव जागृती - विल्यम शुटझ् फिटझ् फर्लस् | २) सामाजिक पृच्छा - बायरन मॅसॉईल्स, बेंजामिन कॉल्स | २) स्वनिमंत्रण व शैथिल्य -स्किनर, रिम्, वोल्प |
| ३) जीवशास्त्रीय पृच्छा - जोसेफ श्वॉब | ३) भिन्नान्वयन - विल्यम गार्डन | ३) प्रयोगशाळा प्रशिक्षण - बेथल माइन | ३) मानसिक तणाव कपातिकरण - रिम्, वोल्प |
| ४) संबोध साध्यता - जेरोम ब्रुनर | ४) वर्गसभा - विल्यम ग्लसर | ४) न्यायतत्त्व शास्त्रीय - डोनाल्ड ऑलिव्हर जेम्स रोव्हर | ४) स्वअग्रहित्त्व - वोल्प, सॉल्टर |
| ५) बोधात्मक विकास - जीन पियाजे | | ५) भूमिकापालन - फॅनी, जॉर्ज शाफ्टेल | ५) निर्संवेदनक्षमता - वोल्प |
| ६) अग्रत संघटक - डेव्हीड आसुवेल | | ६) सामाजिक अभिरूपता खेळ - सेरीन बुकॉक | ६) प्रत्यक्ष प्रशिक्षण - गॅने, स्मिथ |
| ७) स्मरणशक्ती - जेरी ल्युकास | | | |

ISSN–2278-5655


AMIERJ

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–IX, Issues– VI Nov-Dec 2020

| उपयोग | | | |
|---|---|---|---|
| माहिती प्रक्रियाकरण, प्रभुत्त्व, क्षमता विकास, बौद्धिक विकास, संकल्पना निर्मिती, 'स्व' विकासासाठी उपयुक्त | 'स्व' विकासावर भर, समायोजन क्षमता विकास, व्यक्तीविकास व आत्मविकासाची दिशा दाखविण्यासाठी | व्यक्ती- व्यक्ती, व्यक्ती-समाज यांचे संबंध सलोख्याचे व जिव्हाळयाचे करण्यावर भर | विद्यार्थ्यांच्या समस्या ओळखून उपाय शोधणे, वय्क्तीगत ताण-तणावांवर नियंत्रण ठेवणे, व्यक्तीसंबंध सुधारण्याचे कौशल्य विकसित करणे. |

**अध्ययन अध्यापनाची निवड :**




याआधारे प्रतिमान निवडले जाते.

**भूमिकापालन प्रतिमान Role playing Model :**

सदर प्रतिमानास वैयक्तिक आणि सामाजिक मिती आहेत. याद्वारे सामाजिक जगतातील वैयक्तिक भूमिकांचे अर्थ समजू लगतात आणि सामाजिक समूहाच्या सहाय्याने संघर्ष सोडविण्यासाठीही सहाय्य होते. सामाजिक परिस्थितीचे योग्य विश्लेषण करून इतरांशी समंजस्यानी वागणे, आंतरवैयक्तिक समस्या सोडविणे, लोकशाही मार्ग अनुसरणे शक्य होते.

**व्याख्या :**

"कोणतीही व्यक्ती इतरांशी संबंध प्रस्थापित करण्यासाठी भावना एक वैशिष्ट्यपूर्ण आकृतीबंध वापरते यालाच त्या व्यक्तिची भूमिकापालन म्हणतात."

व्यक्तीचे स्वभावविशेष भूमिकांचेच वर्णन होय. इतर व्यक्ती, वस्तू, परिस्थिती यांच्याशी संबंध जोडण्याची प्रत्येकाची वैशिष्टयपूर्ण पद्धती असते. उदा. काहिंना इतरांच्या कृतीचा बोलण्याचा सतत संशय येत असतो, काहींना सर्वच विश्वासार्ह वाटतात.

याबरोबरच स्वत:बद्दलची एक संकल्पना असते. उदा. आपण हुशार आहोत, सतत आपले बरोबरच असते, आपण घाबरट, मूर्ख आहोत, काहीजण सतत नरमाईचे धोरण घेतात. काही एकेकटे, स्वत:शीच रमतात, काही इतरांमध्ये रस घेतात.

आपल्या या भूमिका वर्षानुवर्ष झालेल्या परिणामाचा परिपाक असतो. जसे –

१) आपल्याला कोणत्या प्रकारच्या व्यक्ती भेटतात.

२) इतर व्यक्ती आपल्याशी कोणत्या प्रकारचे वर्तन करतात.

३) इतरांच्या आपल्याकडे पाहण्याच्या दृष्टीकोनाबद्दल आपला अवबोध महत्त्वाचा असतो.

४) आपली संस्कृती, परंपरा, रूढी इत्यादींचाही प्रभाव पडतो.

## भूमिकापालनातील अध्ययन प्रक्रिया (Learning process in Role Playing ):

स्वत:ला व इतरांना चांगल्याप्रकारे समजावून घेण्यासाठी, त्यामागील कारणांचे आकलन होण्यासाठी, सहानुभवामुळे (Impathy) विविध आंतरक्रिया, सामाजिक घटना यांचा अर्थ लावता येणे शक्य होते.

* भूमिकापालनात वास्तव भूमिकांचे प्रतिनिधीत्त्व करणाऱ्या विविध भूमिकांचा अभिनय करण्याची संधी प्राप्त करून दिली जाते. याला <u>अभिरूपता</u> (Simulation) असते.

* विविध भूमिकांचा कृत्रिम व सुरक्षित वातावरणात वास्तव परिस्थितीसंबंधी सराव.

* मुले भूमिकांमध्ये शिरतात, खेळतात ते अनुकरण असते. भूमिका करण्यामागे हेतू नसतो.

* नाटयीकरणात अभिनय, संवाद, हावभाव, निश्चित असतात. हुबेहुब सादरीकरणावर भर असतो.

* भूमिकापालनात वरील सर्व गोष्टींचा अभाव असतो. भूमिका पालनात निव्वळ समस्या दिलेली असते, उत्स्फुर्तपणे भूमिका सादर होते. पूर्वतयारीविना पात्रांमध्ये आंतरक्रिया घडते. भूमिकेनंतर त्रयस्थपणे चर्चा, सादरीकरणाचे विश्लेषण करतात.

## यातून विविध गोष्टींच्या अध्ययनाची संधी मिळते :

स्वत:च्या भावना समजावून घेणे, स्वत:बरोबर इतरांच्या वृत्ती, अवबोध समजावून घेणे, समस्या निराकरण कौशल्यांचा विकास करणे, विषय भिन्न प्रकारे समजावून घेणे.

**या शैक्षणिक ध्येयामागील गृहितके खालील प्रकारची असतात :**

१) वास्तव जीवनातील समस्यायुक्त परिस्थितीशी साम्यदर्शक परिस्थिती निर्माण करता येते. त्यामुळे भूमिकापालन अनुभवजन्य व अध्ययनाला पोषक असते.

२) उत्स्फुर्त सादरीकरणात अभिनय करताना दडपलेल्या भावनांना मोकळी वाट मिळते. या भावनांमुळे वर्तनावर होणारा परिणाम अनुभवता येतो.

३) भावना, कल्पना जाणिवेच्या पाातळीवर आणता येतात.

४) भूमिकांनंतर केले जाणारे विश्लेषण यायोगे अभिवृत्ती, मूल्ये, विश्वास यांची जाणीव होते. इतरांचे दृष्टीकोन समजतात.

५) 'माहिती पुरवणारा' या शिक्षकाच्या भूमिकेला छेद देत याउलट सहाध्यायींचे ऐकणे, त्यांच्याशी आंतरक्रिया घडते. अनुभूतींचा योजक ही भूमिका शिक्षक बजावतो.

आशय, शब्द, भावना, कृती, व्यक्तीचे वर्तन, निर्णय, त्यामागील कारणे, विचारप्रक्रिया जाणण्याचा प्रयत्न केला जातो. सुरूवातीस विद्यार्थी तयार होत नसतील तर मूकनाटय, मूकाभिनय यांचा सराव दयावा. भूमिकापालन मनोरंजनाचा केवळ भाग न मानता अभ्यासक्रमाचाच भाग मानणे आवश्यक आहे.

**समस्या निवड :**

**अ) ऐतिहासिक समस्या :**

इतिहासातील विविध व्यक्ती, त्यांच्यासमोरील प्रश्न, स्त्री शिक्षण, बाल विधवा, स्वातंञ्यसंग्रामाचा मार्ग निवड इत्यादी.

**ब) सामाजिक समस्या :**

प्रांतवाद, जातिभेद, राष्ट्रद्रोही भूमिका, लोकशाहीची तत्त्वे, रूढी, परंपरा इत्यादी.

**क) व्यक्ति - व्यक्तीतील समस्या :**

पिढीतील अंतर समस्या, नाते संबंधातील संघर्ष, समवयस्क गटातील संघर्ष इत्यादी.

**ड) विशिष्ट वर्तन समस्या :**

अपंगत्त्व, एकलकोंडा स्वभाव, हेकेखोर स्वभावप्रवृत्ती इत्यादी

**इ) वैयक्तिक समस्या :**

कुटुंबातील भावंडांतील मतभेद, आई - वडीलांची परस्पर आंतरक्रियेतील त्रुटी इत्यादी.

ISSN–2278-5655

AMIERJ

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–IX, Issues– VI Nov-Dec 2020

### प्रतिमाणाचे परिणाम / उद्दिष्टे ( Effects / Objectives of Model )

| अध्यापनीय परिणाम | पोषित परिणाम |
|---|---|
| १) वैयक्तिक मूल्ये व वर्तनाचे विश्लेषण होते. | १) सामाजिक मूल्ये, समस्या याबाबत काही तथ्ये माहिती होतात. |
| २) आंतरवैयक्तिक समस्या सोडविण्याचे मार्ग प्राप्त होतात. | २) मते, अभिप्राय व्यक्त करणे जमू लागते. |
| ३) सहानुभव वाढतो. (Impathy) | |

### प्रतिमानाचा पदबंध / पायऱ्या

१) **गटाची पूर्वतयारी करणे ( Warm up the group )** समस्या शोध, विद्यार्थी परिचय, समस्या स्पष्टीकरण, पार्श्व भूमी, घटना - व्यक्तींचे वर्णन, पर्याय शोधण्यासाठी सूचना, विविध दृष्टीकोन, भावना, वर्तन याबद्दल भूमिकापालनाची आवश्यकता यासंबंधी वातावरण निर्मिती.

२) **भूमिकापालनासाठी सहभागींची निवड :** आवश्यक पात्रे, वैशिष्टे, भावना कृती निवड, योग्यप्रकारे भूमिका वाटप, निकषांचा विचार करावा.

३) **अभिनयाची पूर्वतयारी :** मार्गदर्शक मुद्दे पात्रांना सांगणे, संवाद पाठांतर नव्हें, स्वतंत्रपणे तयारी करावी, उत्स्फुर्त आंतरक्रिया घडण्याच्या दृष्टीने नियोजन, उपलब्ध साहित्याचा उपयोग करावा, निरीक्षकांना पहाणे - ऐकणे योग्य व्यासपीठ हवे.

४) **निरीक्षकांची पूर्वतयारी :** अभिनय करणाऱ्या विद्यार्थ्यांव्यरिरिक्त अन्य विद्यार्थी निरीक्षकाची भूमिका बजावतील, निरीक्षण ≫ विश्लेषण ≫ चर्चा असे स्वरूप असावे. शाब्दीक वर्तन, अशाब्दीक वर्तन, पात्रांच्या भावना, विचारपद्धती, समस्येचे पैलू, समस्येवर उपाय - पर्याय यांच्या नोंदी घ्यावेत.प्रत्येक गटाला एखादयाच पात्रासंबंधी संपूर्ण निरिक्षण कार्य दयावे. निरीक्षण व प्रश्नसूचीही देण्यास हरकत नाही.

५) **अभिनय करणे :** प्रत्यक्ष अभिनय थोडक्यात सादर व्हावा, उस्त्फुर्त आंतरक्रिया जितक्या वेळ घडेल तितकाच वेळ देण्यात यावा, प्रतिसाद संवादातील महत्त्वाचा, चर्चेनंतर पुर्नअभिनयात सुधारणा सुचवाव्यात.

६) **चर्चा आणि मूल्यमापन :** निरीक्षक प्रथम अभिनयातील चुका, न पटलेले बोलणे, हावभाव याबद्दल चर्चा, पात्रे व निरीक्षक यांच्यात विसंवार झाल्यास शिक्षकाने आपले मत व्यक्त करावे. अभिनयास प्राधान्य न देता भावना, विचार, कृती, शब्द यांना महत्त्व दयावे.

ISSN–2278-5655

AMIERJ

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–IX, Issues– VI Nov-Dec 2020

७) **पुर्नअभिनय :** चर्चेच्या आधारे पुर्नअभिनय पूर्वतयारी नंतर पुन्हा सादर करावे. यामध्ये अन्य विद्यार्थीही सहभागी होवू शकतात. भिन्न शब्दयोजना, भिन्न स्वभाव वैशिष्टे, यामुळे वेगळाा अनुभव मिळतो.

८) **चर्चा व मूल्यमापन :** पुर्नअभिनयाची पायरी क्र.६ नुसार पुन्हा चर्चा करावी.

९) **अनुभवांची देवाणघेवाण आणि सामान्यीकरण :** भूमिकापालनातील पात्र, घटना यातुन जागृत झालेल्या आठवणी दैनंदिन जीवनाशी त्याची तुलना करावी, घाईने सामान्यीकरण शक्य होत नाही परंतु वारंवार अनुभूतीद्वारे ते शक्य आहे.

| | पाठनिरीक्षण व प्रश्नसूची | मोठ्या प्रमाणात | काही प्रमाणात | मुळीच नाही |
|---|---|---|---|---|
| १ | निवडलेला प्रसंग/ विषय/ समस्या विद्यार्थीनुरूप होता का ? | | | |
| २ | समस्येची सर्व बाजुने प्रस्तावना/ चर्चा झाली का ? | | | |
| ३ | विद्यार्थ्यांना भूमिकापालनाचा अर्थ, पद्धती स्पष्ट झाली का ? | | | |
| ४ | पात्र निवड योग्य होती का ? | | | |
| ५ | सहभागी विद्यार्थांनी स्वतंत्रपणे पूर्वतयारी केली का ? | | | |
| ६ | निरीक्षकांची विशिष्ट जबाबदारी स्पष्ट केली का ? | | | |
| ७ | पुरेसा वेळ व रंगमंचव्यवस्था होती का ? | | | |
| ८ | विविध दृष्टीकोनातून चर्चा झाली होती का ? | | | |
| ९ | चर्चेनुसार पुर्नअभिनय केला का ? | | | |
| १0 | दोन्ही अभिनयाची तुलना स्वरूपात चर्चा झाली का ? | | | |
| ११ | सामान्य तत्त्वे / झालेले अध्ययन लक्षात आणुन देण्याचा प्रयत्न झाला का ? | | | |
| १२ | शिक्षकाने स्वत: विना व्यत्यय मार्गदर्शन प्रोत्साहन व प्रत्याभरण दिले का ? | | | |

ISSN–2278-5655

AMIERJ

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–IX, Issues– VI Nov-Dec 2020

पाठटाचण

विद्यार्थी नाव - दिनांक -

इयत्ता - वेळ -

विषय - पूर्वज्ञान -

घटक - गाभाघटक/मूल्यशिक्षण-

| शिक्षक व विद्यार्थी कृती | भूमिकापालन /पदबंध /पायऱ्या |
|---|---|
| * पदबंधानुसार शिक्षक - विद्यार्थी कृती नोंद करावी. | पदबंधाची नावे, पायऱ्या शिक्षका-विद्यार्थी कृतीनुसार लिहाव्यात. |

संदर्भ

१.बोंदार्डे, कौ.मु. (०५/०८/०२), “शास्त्र अध्यापन पद्धती”, पुणे : नुतन प्रकाशन.

२.मुळे, उमाटे, “शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे” महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर.

3. Rao, Usha “Educational Methodology”, Himalaya Publishing house, Parel, Mumbai.